# प्रकरण तिसरे

## माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची कार्यवाही व महत्व

# प्रकरण तिसरे

## माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची कार्यवाही व महत्त्व


३.१ प्रास्ताविक

३.२ भारतीय शिक्षणपध्दतीत मूल्यशिक्षणाचे स्थान

३.३ शैक्षणिक आयोग आणि मूल्यशिक्षण
- ३.३.१ विद्यापीठ शिक्षण आयोग ( १९४८-४९ )
- ३.३.२ माध्यमिक शिक्षण आयोग ( १९५२-५३ )
- ३.३.३ कोठारी आयोग ( १९६४-६६ )
- ३.३.४ श्री. व्ही.एम्.तारकुंडे समिती
- ३.३.५ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ( १९८६ )

३.४ मूल्यशिक्षणाची उद्दिष्टे

३.५ मूल्यशिक्षण शाळा आणि शिक्षकांची जबाबदारी

३.६ मूल्यशिक्षणासाठी काही उपयुक्त उपक्रम
- ३.६.१ शालेय परिपाठ
- ३.६.२ वक्तशीरपणा
- ३.६.३ स्त्री - पुरुष सामानता
- ३.६.४ वैज्ञानिक दृष्टीकोन

३.७ समारोप

संदर्भ

## प्रकरण ३ रे

# माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची कार्यवाही व महत्व

## ३.१ प्रास्ताविक

" ज्ञानदानापुरतेच जे शिक्षण मर्यादित होते ते शिक्षण नव्हे. व्यक्तींच्या सुप्त अंर्तगत शक्तींचा विकास करुन जे शिक्षण त्याच्या अंगी मानवता, राष्ट्रीयत्व व विश्वबंधुत्व निर्माण करील ते खरे जिवंत शिक्षण होय."[१] अरविंद घोष.

व्यक्ती आणि समाज हे परस्परावलंबी आहेत.समाज जर प्रगतीपथावर वाटचाल करत असेल तरच व्यक्तीला स्वतःच्या विकासासाठी संधी प्राप्त होऊ शकेल. शिक्षण ही व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधनारी प्रकिया आहे.व्यक्तीचा सर्वांगीन विकास साधत असताना आपणास व्यक्तीचा शैक्षणिक, सामाजिक,राजकीय व आर्थिक विकास साधावा लागणार आहे. या विकासाबरोबरच व्यक्तीचा नैतिक विकास साधावा लागणार आहे.नैतिक विकास साधन्यासाठी व्यक्तीमध्ये काही नितीमूल्ये संक्रमित करणे आवश्यक आहे. नितीमूल्ये संक्रमित करण्यासाठी आपणास नितीमूल्ये म्हणजे काय ? किंवा मूल्यशिक्षण म्हणजे काय ? हे पाहणे आवश्यक आहे.

### मूल्यशिक्षणाचा अर्थ :-

सर्व प्रथम आपण मूल्यशिक्षण म्हणजे काय ? त्याचे स्वरुप कसे आहे ? याचा अभ्यास करु. इंग्रजी मधील Value या शब्दाला मराठीत ' मूल्य ' असा प्रतिशब्द वापरला जातो. N.C.E.R.T. ने प्रसिध्द केलेल्या व्हॅल्यूज ॲन्ड स्कूल मध्ये ' मूल्य 'या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

" A value is what is desired or what is sought.Values may be oferationally conceived as those guiding principles of the life which are conducive to one's physical and mental health as well as to social welfare and adjustment and and which are in time with one's culture "[२]

मूल्य म्हणजे ज्यांची आकांक्षा धरावी वा पाठपुरावा करावा अशी गोष्ट. परंपरेला धरुन एखाद्याच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याला तसेच समाज हिताला आणि समायोजनाला उपयूक्त ठरणारी मार्गदर्शक जीवनतत्वे म्हणजे मूल्ये होत अशी मूल्याची व्याख्या करता येईल.

मूल्य शब्दाची व्याख्या अभ्यासल्यानंतर आपणास मूल्यशिक्षणाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्काराचे शिक्षण शिक्षणातून विद्यार्थी ज्ञान संपन्न व कौशल्य पारायण होईल पण मूल्यशिक्षणामूळे मनाने तो सुसंस्कारित होईल. मूल्यशिक्षणाचे महत्व स्पष्ट करताना प्रसिध्द शिक्षक तज्ज्ञ

श्री. जे. पी. नाईक "Policy and performance in Indian education (१९४७- ७४) या पुस्तकात म्हणतात." Education is essentially a three fold process; importing information, teaching of skills and cultivating of values. In the present educational system,the emphasis is almost exclusively on the first of these objectives the imparting of information . The second objective viz ; the teaching of skill is partially attemped and the most important reform relates to the third objective which has been neglected in the past Viz; the cultivation of the values Let's realize that no education can be really value neutral and that if we do not cultivate the right values, the wrong one,s will eventually emerge and dominate the sence. we most therefore now lay the highest emphasis in our educational system on the cultivation of the values appropriate to a modern democratic & socialist society " [३]

२० व्या शतकात विज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाच्या भौतिक सुविधेमध्ये लक्षणीय प्रगती दिसून येते. लोकसंख्या झपाटयाने वाढत असल्यामुळे भौतिक सुविधा अपु-या वाटत आहेत. संख्यात्मक वाढ जरी लक्षणीय दिसत असली तरी गुणात्मक वाढ झाली असे म्हणणे धाडसाचे ठरणार आहे. गुणात्मक वाढ खुंटल्यामुळे मानवाचे जीवन असुरक्षित होत चालले आहे. जीवन समृध्द व सुखी करण्यासाठी काही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. हे करण्यासाठी मूल्यशिक्षण निश्चितच उपयोगी ठरणार आहे. मूल्य शिकविता येत नाहीत हे जरी सत्य असले तरी सुध्दा मूल्याचे संक्रमण निश्चित होऊ शकते. माध्यमिक शाळेत शिकणारा विद्यार्थी हा ११ ते १८ या वयोगटाचा असल्याकारणाने त्याच्यावर जे संस्कार होणार आहेत ते संस्कार त्याला आयुष्यभर उपयोगी पडणारे आहेत कारण 'जे गुण बाळा ते गुण जन्म कळा असे म्हटलेलेच आहे. वातावरण, सहवास, उपक्रम, कार्यक्रम, वाचन, मनन, अनुभव, संस्करण व जीवनदृष्टी यांच्या साहयाने मूल्ये आत्मसात करायची असतात. या सर्वच गोष्टी विद्यार्थांना शालेय वातावरणात मिळणे शक्य असते. मूल्य रुजविण्यासाठी शालेय वातावरण अनुकूल असावे. त्याच प्रमाणे शिक्षकांचे वर्तन सुध्दा मूल्यशिक्षणाला पोषक असे असावे लागते. शिक्षक जर आदर्श मूल्याची जोपासना करत असेल तरच हे कार्य शक्य आहे. कारण शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेचा आत्मा आहे.

## ३.२ भारतीय शिक्षण पध्दतीत मूल्यशिक्षणाचे स्थान :-

अतिप्राचीन काळापासून भारतीय शिक्षण पध्दती ही सत्यंम, शिवमं, सुंदरमं या तीन ध्येयावर अवलंबून आहे. जीवनाचे अंतीम ध्येय हे मोक्ष प्राप्ती आहे. असे भारतीय दर्शन शास्त्र सांगते. शीलसंवर्धन व चारित्र्यनिर्मिती यामधून विद्यार्थ्याने आपला व समाजाचा विकास साधला पाहिजे. शिक्षण प्रक्रियेमध्ये प्राचीन काळी गुरूशिष्य संबंध हे अत्यंत जिव्हाळ्याचे होते. गुरू व शिष्य यांचे नाते पिता पुत्राचे होते. गुरूगृही राहून शिष्य आपले अध्ययनाचे कार्य पूर्ण करत असे. गुरूचे वर्तन हे आदर्श असल्यामुळे शिष्याचे वर्तन सुयोग्य मार्गाने होत असे. विद्यार्थ्यांना नैतिक व धार्मिक शिक्षण देण्यासाठी नालंदा, कांची ,तक्षशिला, विक्रमशिला ही विद्यापीठे प्रसिध्द होते. अशा विद्यापीठांमधून शिक्षणक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांचे तन, मन कार्यक्षम होते. अध्यात्मवाद, कार्यवाद, निसर्गवाद या तत्वज्ञानाच्या संप्रदायांनी सुध्दा मूल्यशिक्षण देण्याचे कार्य केल्याचे आपणास दिसून येते.

अध्यात्मवादात धार्मिक, सामाजिक,नैतिक व सौदर्यात्मक मूल्यांचा अंतर्भाव आहे. ही मूल्ये आत्मसात करण्यासाठी व्यक्ती व समाज यांच्यामध्ये बंधूभाव निर्माण होणे गरजेचे आहे. असे अध्यात्मवादाचे म्हणणे आहे. नैतिक मूल्याचे संक्रमन होण्यासाठी सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिगृह, बंधुभाव, कर्तव्यपालन इत्यादी गुण विद्यार्थ्यांनी अंगी बाणले पाहिजे. नीतिमय जीवन जगण्यासाठी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या सहा शत्रूंवर विजय मिळविला पाहिजे.

अध्यात्मवादात नैतिक मूल्याचे संस्कार करुन चरित्र घडविणे हे शिक्षणाचे महत्वाचे उद्दिष्ट होते. समावर्तन-पदवीदान प्रसंगी विद्यार्थ्यांना जो आशीर्वादपर उपदेश केला जाई. त्यात सद्वर्तनावर भर होता. उपदेश देत असताना "सत्यं वद। धर्मचर। स्वाध्यायान्मा प्रमदः । आचार्याय प्रियं धनमहाव्य। प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः। सत्यान्न प्रमादितव्यम । धर्मान्न प्रमादितव्यम्। कुशलान्न प्रमादितव्यम्। भूत्यैःन प्रमादितव्यम । स्वाध्यायप्रवचनाभ्याम् प्रमादितव्यम। देव पितृकार्याभ्याम न प्रमादितव्यम् !"याचा अर्थ सत्य बोलत जा, धर्माचरण कर, विद्याव्यासंग सोडू नको, गुरूला संतोषकारक धन आणून दे, वंशच्छेद करु नकोस, नकोस वंशवृध्दी कर. सत्यापासून भ्रष्ट होऊ नकोस. धर्मापासून भ्रष्ट होऊ नकोस, अध्ययनः अध्ययनाविषयी हयगय करु नकोस, देवांच्या व पितरांच्या कामात चुकू नकोस "[४]

कार्यवाद हा धर्मसंस्था मानत नाही. निश्चित स्वरुपाची ध्येय नाहीत. भूतकाळातील घटनावर जास्तविचार करण्यापेक्षा वर्तमान काळावर अधिक लक्ष केंद्रित करावे व त्यामध्ये नवीन सुधारणा घडवून आपले जीवन यशस्वी करावे असे हा पंथ सांगतो. मुलामध्ये प्रयोगशीलता, कृतीशीलता, चिकित्सकवृत्ती निर्माण होणे आवश्यक आहे. आणि असाच अभ्यासक्रम हया प्रणालीला अभिप्रेत आहे. या दोन्ही प्रणालींचा विचार करता आपणास असे लक्षात येते की धर्माचे स्थान मान्य असो अथवा नसो परंतु नैतिक विकास हा दोन्ही प्रणालीने मान्य केलेला आहे.

भारतावर वेळोवेळी अनेक अक्रमणे झाली त्यामुळे प्रत्येक वेळी शिक्षण व्यवस्थेवरती बदल होत गेले. भारतावर इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केल्यामुळे ब्रिटीश शिक्षणाचा प्रभाव भारतीय शिक्षण व्यवस्थेवरती अधिक असल्याचे आपणास दिसून येते. इंग्रजानी भारतामध्ये सेक्युलर ( निधर्मी ) शिक्षण प्रणाली आणली होती. तसे करण्याशिवाय त्यांना पर्याय नव्हता. पण चारित्रसंवर्धनाचा आणि संस्काराचा असे दोन्ही प्रश्न परस्पर निगडीत आहेत असे ज्यांना वाटत होते त्याना ही प्रणाली मान्य होत नव्हती स्वातंत्र्य प्राप्ती नंतर आपण शिक्षण व्यवस्थेवरती विचार करण्यास आपण मुक्त झालो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशात शिक्षण व्यवस्थेत वेगवेगळे बदल घडून आले. त्याचप्रमाणे संपूर्ण देशात शिक्षणव्यवस्थेत एकवाक्यता आणण्याचा प्रयत्न केला गेला. शिक्षण प्रक्रिया परिपूर्ण होण्यासाठी वेगवेगळे आयोग स्थापन करण्यात आले त्या प्रत्येक आयोगाने मूल्यशिक्षणाचे महत्व विशद केलेले आहे.

## ३.३ शैक्षणिक आयोग आणि मूल्यशिक्षण :-

### ३.३.१ विद्यापीठ शिक्षण आयोग ( १९४८-४९ )

डॉ. राधाकृष्णन् यांच्या नेतृत्वाखालील विद्यापीठ आयोगाने नैतिक व धार्मिक शिक्षण पुस्तके शिकविल्याने असे समजणे पोरकटपणाचे ठरेल असे म्हटले आहे. नैतिक शिक्षण देण्यासाठी खालील शिफारशी या आयोगाने केलेल्या आहेत त्या अशा

१. शाळा सुरु होण्या अगोदर मूकप्रार्थना घ्यावी .

२. थोर धर्मसंस्थापकांच्या चारित्रचा अभ्यास करावा.

३. पवित्र धर्मग्रंथातील निवडक उतारे अभ्यासावे.

४. धर्मविषयक तत्वज्ञानाच्या समस्या व त्या विषयीचा तौलनिक अभ्यास करावा अशा शिफारशी सुचविण्यात आलेल्या आहेत.

### ३.३.२ माध्यमिक शिक्षण आयोग (१९५२-५३)

डॉ. मुदलीयार यांच्या नेतृत्वाखालील माध्यमिक शिक्षण आयोगाने धार्मिक व नैतिक शिक्षणाची सुरूवात कुटूबांकडून व्हावी. अशी अपेक्षा व्यक्त केली अशाप्रकारचे शिक्षण देण्यासाठी पवित्र ग्रंथांचे अध्ययन, धार्मिक संस्कार यावर भर दिला होता. तसेच धर्मद्वेष, संघर्ष व भेदभाव यापासून दूर रहावे असे सुचविले नैतिक शिक्षण देण्यासाठी कुटुंबाने व शाळांनी पुढे आले पाहिजे असे सुचित केले.

### ३.३.३ १९६४- ६६ चा कोठारी आयोग

कोठारी आयोगाने आधुनिकीकरणाचा पुरस्कार केला आहे. असे असले तरी सुध्दा नैतिक शिक्षणाचे महत्व या आयोगाने नाकारले नाही. देशात अनेक जाती पंथाचे लोक राहतात. देशात बंधूभाव निर्माण करण्यासाठी जातीभेद दूर करण्यासाठी धर्मनिरपेक्ष संकल्पना स्पष्ट झाल्या पाहिजेत. या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी मूल्यशिक्षण कार्यक्रमाचे स्वरुप खालील प्रमाणे सांगितले आहे.

१. नैतिक व आध्यात्मिक मूल्यांसाठी वेळापत्रकात दोन तासिका.

२. प्राथमिक शिक्षणात गोष्टीरुपाने नैतिक शिक्षण द्यावे. धर्म संस्थापकाचे जीवनपट त्यात असावेत वाचन पुस्तकात नीतीकथा समाविष्ट असाव्यात.

३. अठवडयातून एकदा शाळेत समूहगीताचे गायन.

४. सर्वधर्मातील सर्वमान्य शाश्वत मूल्ये शिक्षकाने स्पष्ट करुन सांगावीत.

५. शालेय कार्याला सुरूवात होण्यापूर्वी थोडावेळ विद्यार्थ्यांनी मौन पाळावे.

६. सर्वधर्मांचे उत्सव सामुहिक स्वरुपाचे साजरे करावे.

७. विविध धर्मांचा ऐतिहासीक व तासिक अभ्यास तुलनात्मक दृष्टिने करावा.

## ३.३.४ श्री. व्ही. एम्. तारकुंडे समिती

श्री. व्ही तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या या समितीने पुढील १० वर्षासाठी शिक्षण विषयक विकासाचे धोरण (Policy frame for the development of education over the next ten year's) (१९७८-८७) या विषयाचा अहवाल सादर केला त्यात चारित्रसर्वधन, वैज्ञानिक दृष्टिकोन, सांस्कृतिक मूल्यसंर्वधन यांवर भर दिला आहे. लोकसमूहाचा सांस्कृतिक मूल्यांचा परिचय शिक्षणातून घडावा अशी भूमिका या समितीने विषद केली आहे.

## ३.३.५ १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

मूल्यांच्या -हासाबद्दल चिंता व्यक्त करून सामाजिक व नैतिक मूल्ये रुजविण्यासाठी शिक्षण हे समर्थ साधन बनले पाहिजे.विद्यार्थ्यांच्या नैतिक व भावनिक विकासावर यात भर दिला आहे. भारतीय समाजात ऐक्य व पूर्णत्व निर्माण होण्यासाठी शिक्षकाने शाश्वत व वैर्श्विक मूल्यांना उत्तेजन द्यावे तसेच धर्मवेड, हिंसा, लोकभ्रम, दैववाद या गोष्टी मूल्यशिक्षणाच्या माध्यमातून कमी कराव्यात असे नमूद केले आहे.

## ३.४ मूल्यशिक्षणाची उद्दिष्टे

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची कार्यवाही करण्याचे शासनाने ठरविल्यानंतर मूल्यशिक्षणाची काही उद्दिष्टे शासनानी डोळ्यासमोर ठेवली आहेत ती खालील प्रमाणे

१. परस्परांबद्दल प्रेम, भूतदया, क्षमशीलता, अहिंसा, समता, बंधुता, कर्तव्यदक्षता, सेवावृत्ती, न्यायप्रियता, विज्ञाननिष्ठा, साहसीवृत्ती इत्यादी मानवी गुण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावेत.

२. व्यक्तीला निरोगी, निरामय जीवन जगता यावे म्हणून समर्थता यावी.

३. कुटुंबातील घटक म्हणून कुटुंबातील अन्य व्यक्तीशी आदर युक्त, जिव्हाळ्याचे, संबंध प्रस्थापित होण्यासाठी पोषक मूल्यांची ( आदरभाव, परस्पर सहकार्य, बंधुभाव, प्रेम इत्यादी) जोपसना व्हावी.

४. व्यक्तीगत व सामाजिक जीवनाची जबाबदारी पेलूशकणारे नागरिक निर्माण व्हावेत.

५. धर्म, भाषा, जाती लिंग यावर आधारीत संकुचित दृष्टीचा लोप करण्याकरिता वैचारिक जागृती व्हावी.

६. स्वतः विषयी, मित्रांविषयी, शेजा-या विषयी, देशाच्या प्रगतीविषयी, पर्यावरणाविषयी, तसेच सर्वधर्म व संस्कृती याविषयी उदार दृष्टिकोन विकसित व्हावा.

७. देशाच्या अर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा दृष्टीने प्रोत्साहन मिळावे.

८. आत्मसन्मान जागृत होऊन आत्मोध्दारासाठी प्रयत्नशील व्हावे.

९. ज्या परिसरात आपण वाढतो व वावरतो त्यापरिसरातील कलाकृती, निसर्ग,प्राणी-पक्षी यांचे संरक्षण व जोपासना करण्यासाठी प्रेरित व्हावे व या सा-यांबद्दल प्रेम, आपूलकी निर्माण व्हावी.

१०. समाजात एक घटक म्हणून लोकशाही जीवनपध्दती, सामाजिक बांधिलकी, धर्मनिरपेक्षता, सामाजिक एकसंघता यासाठी यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांचा परिषोष व्हावा.

## ३.५ मूल्यशिक्षण : शाळा आणि शिक्षकांची जबाबदारी :-

माध्यमिक शाळेत शिक्षण घेणारा विद्यार्थी हा ११ ते १८ वयोगटातील असतो. त्याचा दिवसातील अधिकाधिक वेळ शाळेत व शिक्षकाच्या सहवासात जात असतो. त्याचा परिणाम असा होतो की ज्याप्रमाणे विद्यार्थ्यावर कुटुंबातील व्यक्तींचा चांगला वाईट परिणाम होतो. तद्वत शाळेतील अनेक चांगल्या व वाईट गोष्टींचा परिणाम देखील विद्यार्थ्यावर होत असतो. मूल्यशिक्षण हा विषय अभ्यासक्रमात स्वंतत्र्य विषय म्हणून समाविष्ठ केलेला नाही.त्यामूळे मूल्याचे संक्रमन व्यवस्थीतपणे विद्यार्थ्यांमध्ये करावयाचे असेल तर शालेय वातावरण निकोप व विद्यार्थ्याला उत्साह वर्धक असे वाटले पाहिजे. ही माझी शाळा आहे याचा विद्यार्थ्याला अभिमान वाटला पाहिजे. त्याला शाळे बद्दल गोडी वाटली पाहिजे. अशा गोष्टी विद्यार्थ्याच्या मनात निर्माण करावयाच्या असतील तर शालेय इमारत, शाळेतील भौतिक सुविधा, शालेय परिसर हा योग्य असला पाहिजे. शालेय ग्रथालय, विज्ञान प्रयोगशाळा, खेळाचे मैदान या भौतिक सुविधा पुरेशा असतील तर मूल्यशिक्षणाचे उपक्रम घेनांना अडचणी निर्माण होणार नाहीत . शालेय वातावरणाबरोबरच शाळा चालविणारा महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक त्याचे

स्थान मूल्यशिक्षण उपक्रमात महत्वाचे आहे. मूल्यांचे योग्य पध्दतीने संक्रमण करावयाचे असेल तर सुरूवातीला शिक्षकामध्ये योग्य पध्दतीने मूल्यांची रुजवणूक झाली असली पाहिजे तर विद्यार्थ्यामध्ये मूल्ये संक्रमीत करता येतील. शिक्षकांनी वेगवेगळ्या उपक्रमातून मूल्ये पकडली पाहिजेत. त्यांच्या वृत्तीत ती रुजली पाहिजेत. वैज्ञानिक दृष्टीकोन विद्यार्थ्यांमध्ये रुजवायचा असेल तर शिक्षकाने स्वतः अंधश्रध्देपासून दूर राहिले पाहिजे. श्रमप्रतिष्ठा मूल्य रुजविण्यासाठी शिक्षकाने स्वतः श्रम केले पाहिजेत वक्तशीरपणा विद्यार्थ्यांत निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी शाळेतील सर्वच कामे वेळच्यावेळी पूर्ण केली पाहि जेत. वेगवेगळ्या उपक्रमातून शिक्षकांनी स्वतः अनुभव घेऊन स्वतःचे मूल्यशिक्षणाच्या संदर्भातील ज्ञान प्रगल्भ केले पाहिजे कारण विद्यार्थी हा शिक्षकाचे अनुकरण करत असतो. जर शिक्षकाजवळ आदर्श मूल्ये नसतील तर ती विद्यार्थ्यामध्ये संक्रमीत होणे अतिशय कठीण होणार आहे. शिक्षकामध्ये नवनिर्यामक दृष्टिकोन असणे हे मूल्य शिक्षणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे.

## ३.६ मूल्यशिक्षणासाठी काही उपयुक्त उपक्रम

विद्यार्थ्यामध्ये मूल्यांचे योग्य पध्दतीने संक्रमण होण्यासाठी उपक्रमांची निवड योग्य असली पाहिजे. कार्यक्रमांची मांडणी सूत्रबध्द असणे आवश्यक आहे. कार्यक्रमांचे नियोजन वर्षाच्या सुरवातीला करणे महत्वाचे आहे. कारण त्यामुळे वर्षभरात कोणते उपक्रम कोणत्यावेळी घ्यावयाचे हे निश्चित करता येते. प्रस्तूत संशोधनात ज्या मूल्यांचा संशोधकाने अभ्यास केला आहे. त्या मूल्यांसाठी काही उपयुक्त उपक्रमांचे स्वरुप खाली विषद केलेले आहे.

### ३.६.१ शालेय परिपाठ

शालेय स्तरावर विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या सामूहिक कार्यातून करावयाचा क्रमबंध्द दैनंदिन उपक्रम म्हणजेच शालेय परिपाठ होय. उद्दिष्टानुसार योजनाबध्द रीतिने सातत्याने करावयाचा उपक्रम म्हणजे परिपाठ शालेय परिपाठ हा संपूर्ण शाळेचा असा विशेष उपक्रम आहे. तो अर्थपूर्ण असावा त्यात सातत्य नियमितता असणे आवश्यक आहे. या उपक्रमांची सुरूवात शाळेच्या प्रारंभी व्हावी यामध्ये मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थ्यांनी एकत्र येणे आवश्यक आहे. परिपाठ घेत असतांना तो कमीतकमी ३० मिनीटांचा असावा परिपाठात यांत्रिकपणा, एकसुरीपणा नसावा. दैनंदिन प्रार्थनेचा अर्थ विद्यार्थ्यांना समजावून द्यावा. परिपाठात गरजेनुसार नाविन्य असावे तशीच रंजकता असावी परिपाठ घेत असताना त्यामध्ये राष्ट्रगीत, प्रार्थना, प्रतिज्ञा,पसायदान,सुविचार कथन, आजची विशेष बातमी, दिनविशेष, विशेषदिन, शिक्षक- मुख्याध्यापक मार्गदर्शन, समूहगीत, मौन, परिसर स्वच्छता, शाळा सुटतांना वंदे मातंरम इत्यादि बाबींचा विचार व्हावा.

दिनविशेष व विशेषदिन यामध्ये फरक करुन ते उपक्रम राबवावेत

"जिज्ञासेची होई पूर्ती ।
कर्तव्याची जाण चित्ती ।।
स्मृती या छात्रा देती स्फूर्ती ।
चैतन्याची मिळते शक्ती ।। "

साधुसंत, राष्ट्रभक्त, तत्ववेत्ते, शास्त्रज्ञ, लोकनेते यांनी जनसामान्याच्या मनावर ठसा उमटवलेला असतो. असे दिन साजरे करणे म्हणजे दिनविशेष तर, बालदिन, पर्यावरणदिन, विज्ञानदिन, भूगोलदिन, शिक्षकदिन, ध्वजदिन साजरे करणे म्हणजे विशेषदिन

### ३.६.२ वक्तशीरपणा

कोणत्याही कामामध्ये अपेक्षित यश मिळवायचे असेल तर त्या कामाची सूत्रबध्द आखणी किंवा नियोजन करावे लागते. नियोजनानंतर त्या प्रत्येक गोष्टीचा वेळच्यावेळी पाठपुरावा करावा लागतो. त्यामुळे यश प्राप्त होण्यास अडचण निर्माण होत नाही. कोणतेही काम मग ते लहान असो किंवा मोठा असो ते वेळच्यावेळीं करावे, हे विद्यार्थ्यांना शिक्षकांनी पटवून दिले पाहिजे. वक्तशीरपणा हा केवळ एक सद्‌गुण राहिलेला नाही, तर प्रभावी व्यक्तीमत्वाचे अभिन्नअंग बनले आहे. वेळेचे मोल पैशापेक्षा कितीतरी पट अधिक आहे. आपण वक्तशीरपणे वागलो नाहीतर

"आला क्षण गेला क्षण
हाती काही राहीले नाही
वेळ नाही पाळणार तर
हाती काही उरले नाही" [६]

असे म्हणत हात चोळत बसावे लागते.

विद्यार्थ्यांना वक्तशीरपणाचे महत्व पटवून देण्यासाठी शाळेमध्ये कटाक्षाने वेळेवर येणे, सर्व कार्यक्रमांना वेळेवर उपस्थित राहणे, स्वतःचे वेळापत्रक तयार करणे व त्याचे तंतोतंत पालन करणे. फलकावर वक्तशीरपणा बद्दल सुविचार लिहिणे. संवाद,नाटयछटा,नाटक दृश्ये, भिंत्तीपत्रके यांव्दारा वक्तशीरपणाची माहिती पटवून देणे, वेळच्यावेळी गृहपाठ देणे व तपासून घेणे इत्यादी उपक्रम शाळांमध्ये राबविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये वक्तशीरपणा हे मूल्य संक्रमीत करण्यासाठी शिक्षकांनी सुध्दा वक्तशीरपणा कटाक्षाने पाळणे आवश्यक आहे.

### ३.६.३ स्त्री - पुरूष समानता

" यत्र नार्यस्तु पूजन्ते समन्ते तत्र देवताः
ज्या ठिकाणी स्त्रियांचा सन्मान होत असेल, त्या ठिकाणी देवतांचा वास असे " [७]

प्राचीन काळी समाजात स्त्रियांना प्रतिष्ठेचे स्थान होते पण मनुस्मृती पासून स्त्रीचे समाजातील स्थान दुय्यम दर्जाचे ठरविण्यात आले त्यावेळेपासून स्त्रीने चूल व मूल फक्त पहावे पुरूषांची बरोबरी करु नये असा अलिखीत नियमच तयार झाला. त्यामुळे कुटूंबाचा दर्जा खालावला. समाजाची प्रगती दर्जेदार व्हावयाची असेलतर स्त्री - पुरूष असा भेदभाव न करता दोघांनाही समान दर्जा देणे आवश्यक आहे. स्त्री - पुरूष समानता हे मूल्य विद्यार्थ्यात रुजवायचे असेल तर शाळांमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवले पाहिजेत. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, कतृत्ववान स्त्रीयांचे कौतुक करावे, कोणत्याही कामावर पुरूषांचे काम किंवा स्त्रीयांचे काम असा शिक्का मारु नये. मुलांमुलींचे जन्मदिन सारख्याच रितीने उत्साहने साजरे करावेत. रक्षाबंधन, भाऊबीज हे सण

नाविन्यपूर्ण पध्दतीने विद्यालयात साजरे करावे. असे उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्त्री - पुरूष समानता हे मूल्य राबविण्यात त्याचा निश्चित उपयोग होईल.

### ३.६.४ वैज्ञानिक दृष्टीकोन

एकवीसवे शतक हे विज्ञान युगाचे प्रगतीचे शतक असणार आहे. काळ आणि वेग या संकल्पना संकुचित होत जाणार आहेत असे मत प्रसिध्द भारतीय शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर यांनी दादर येथील ७९ व्या आखिल भारतीय साहित्यसंमेलनात उद्घाटनाच्या वेळीस स्पष्ट केले. प्राचीन काळी एखादा शोध लागला तर तो प्रसिध्द होण्यास ७० ते ८० वर्षे लागत पण Internet मुळे नवीन शोध ताबडतोब लाखो लोकांसमोर सहज पोहचतात. अशा परिस्थीतीमध्ये विद्यार्थ्यांनी सुध्दा अंधश्रध्दाळू राहून चालणार नाही तर त्यांनीसुध्दा विज्ञानाची कास धरुन प्रगती साधने आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये लहान पणापासून विज्ञानाची गोडी निर्माण केली पाहिजे. त्यासाठी विद्यालयामध्ये वेगवेगळे उपक्रम राबविणे आवश्यक आहे त्यामध्ये वैज्ञानिक सहली काढणे, वैज्ञानिक खेळणी तयार करणे, औषधी वनस्पतीचे गुणधर्म समजावून देणे. पर्यावरण दिन, व्यसनमुक्ती फेरी यांचे आयोजन करणे, स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी स्वच्छ शरीर, आनंददायक आरोग्य व निरोगी मन या संकल्पना समजावून देणे वेगवेगळ्या उपक्रमांमधून शक्य आहे.

### ३.६.५ श्रमप्रतिष्ठा

"श्रमजीवी माणसाच्या अंगातून गळणारे घामाचे पाणी हे सर्वांत थोर. साने गुरुजी" ‘

कोणत्याही कामाबद्दल कमीपणा वाटू नये म्हणून महाराष्ट्रातील अनेक शिक्षणतज्ज्ञांनी वेगवेगळे उपक्रम सुचविले त्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी "कमवा आणि शिका" ही योजना यशस्वीपणे राबवली अनेक गरीब व होतकरु विद्यार्थी शिकवून उच्च पदावर नेऊन दाखविले. कोठारी आयोगाने SUPW या उपक्रमातून श्रमप्रतिष्ठा रुजवावी असे सुचविले आहे.

आजच्या परिस्थीतीमध्ये विद्यार्थांच्या मनात श्रमप्रतिष्ठेचे महत्व वाढावे यासाठी विद्यालयात मूल्यशिक्षणाच्या माध्यमातून शालेय परीसर स्वच्छता, ग्रामसफाई, श्रमदान शिबीर, वर्गस्वच्छता, वृक्षारोपण इत्यादी कार्यक्रम घेता येतील त्यामुळे विद्यार्थ्यांचे मन व मनगट बळकट होईल.

## ३.७ समारोप

मूल्यशिक्षणाची कार्यवाही माध्यमिक शाळांमध्ये करत असतांना शिक्षकाच्या भूमिका महत्वाच्या आहेत. शिक्षक हा दिपस्तंभा सारखा विद्यार्थ्यांसमोर उभा असतो. शिक्षकाचे वर्तन आदर्श असले पाहिजे. शिक्षकांचे अनुकरण विद्यार्थी करत असतात. शिक्षकाने शाळेमध्ये अभ्यासक्रमातून तसेच वेगवेगळ्या उपक्रमातून जर मूल्यशिक्षण रुजवायचे ठरवले तर मूल्यशिक्षणाचे प्रभावी कार्य शिक्षकाच्या हातून सहजपणे घडून येईल. फक्त शिक्षक हा उपक्रमशील असला पाहिजे.

# संदर्भ


१. श्री. पाटसनीस न.रा.
शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका
पुणे, नूतन प्रकाशन, १९९४
पान नं. - ६

२. श्री. देवस्थळी रा. भा
शिक्षण भारती मूल्यशिक्षण विशेषांक
बाहूबली, अनेकान्त शोधपीठ,श्री. बाहूबली विद्यापीठ,
बाहूबली - १९९२
पान नं. - ४

३. श्री. करंदीकर सु. वा.
मूल्यशिक्षण
कोल्हापूर, फडके प्रकाशन, १९९७
पान नं. -४

४. श्री. कुंडले म.बा.
शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र
पुणे, श्री विद्या प्रकाशन १९९८
पान नं. - ५८

५. - - -
मूल्यांचे शिक्षण
शिक्षक हस्तपुस्तिका (इयत्ता १ली ते ८वी)
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
पुणे, १९९६
पान नं. - ३,४

६. गुप्ते ललिता
दिनविशेष आणि विशेषदिन
पुणे, उन्मेष प्रकाशन,१९९३
पान नं. - १३

७. Ibid 1

८. श्री. साने पा.स.
‘ अमृत बोल ’
पुणे, साने गुरुजी स्मारक प्रकाशन, १९९९
पान नं. - १०